दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरूवार, दि. १ ऑक्टोबर २०२६ | वर्ष - २ | अंक - ८ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

दिनांक : १ ऑक्टोबर २०२६ वार : गुरुवार माह (अमावस्यांत) : भाद्रपद माह (पूर्णिमांत) : आश्विन ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : पंचमी तिथी (दुपारी १२:३५ पर्यंत) त्यानंतर षष्ठी तिथी नक्षत्र : रोहिणी नक्षत्र (२ ऑक्टोबर सकाळी ०४:२६ पर्यंत) त्यानंतर मृगशीर्ष नक्षत्र योग : सिद्धि योग (रात्री ०९:१७ पर्यंत) त्यानंतर व्यातीपात योग करण : तैतुला करण (दुपारी १२:३५ पर्यंत) त्यानंतर गराजा करण चंद्र राशी : वृषभ राशी सूर्य राशी : कन्या राशी अशुभ मुहूर्तः राहु काळ : दुपारी ०१:५७ ते दुपारी ०३:२७ पर्यंत शुभ मुहूर्तः अभिजित : दुपारी १२:०४ ते दुपारी १२:५२




# टीम इंडियानं ४०० पारची लढाई सहज जिंकली! वेस्ट इंडिजविरुद्धची मालिका खिशात!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
गुवाहाटी : वृत्तसंस्था

शुभमन गिलच्या विक्रमी द्विशतकासह रोहित शर्माच्या दमदार शतकाच्या जोरावर टीम इंडियाने गुवाहाटीच्या मैदानावर ४०६ धावांचे विशाल लक्ष्य सहज पार केले. भारताने ८ विकेट्स राखून दणदणीत विजय मिळवत वेस्ट इंडिजविरुद्धची मालिकाही खिशात घातली.

वनडे क्रिकेटच्या इतिहासात ४०० पेक्षा अधिक धावांचे लक्ष्य यशस्वीपणे पार करण्याची ही केवळ दुसरी वेळ ठरली. याआधी दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाविरुद्ध ४३८ धावांचे लक्ष्य गाठले होते. त्यामुळे भारत हा हा ४०० हून अधिक धावांचा यशस्वी पाठलाग करणारा फक्त दुसरा संघ ठरला आहे. विशेष म्हणजे तीन शतकवीरांना कडक रिप्लाय देताना भारताचा कर्णधार गिलने एकट्याने निम्म्या धावा काढल्या.

गुवाहटीच्या मैदानात नाणेफेक जिंकून शुभमन गिलने पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कॅरेबिन संघातील सलमावीर जॉन कॅम्पबेल याने ६८ चेंडूत ९ चौकार आणि ५ षटकारांच्या मदतीने १०१ धावांची दमदार खेळी केली. कर्णधार शाई होपनं ९४ चेंडूत ८ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने केलेल्या १०४ धावा आणि अमिर जंगूच्या ७७ चेंडूतील ११४ धावांच्या जोरावर वेस्ट इंडिजच्या संघाने पहिल्यांदाच ४०० धावांचा पल्ला पार करत निर्धारित ५० षटकांत ८ बाद ४०५ धावा करत टीम इंडियासमोर ४०६ धावांचे तगडे आव्हान ठेवले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना कर्णधार शुभमन गिल आणि रोहित शर्मा यांनी धमाकेदार सुरुवात करुन दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी २५५ धावांची भागीदारी रचत विक्रमी लक्ष्याचा पाठलाग अगदी सुलभ केला. रोहित शर्मा ७५ चेंडूत २० चौकार आणि ६ षटकारांच्या मदतीने १०१ धावा करून परतल्यानंतर शुभमन गिलने १३३ चेंडूत २६ चौकार आणि ८ षटकारांच्या मदतीने नाबाद २२३ धावांची खेळी करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. विराट कोहलीने १९ चेंडूत ३ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने २९ धावांचे योगदान दिले. ऋतुराज गायकवाडने ३७ चेंडूत २ चौकारांच्या मदतीने नाबाद ३१ धावांची खेळी केली.

# धार्मिक स्वातंत्र्य की मालकीहक्काचा प्रश्न? घरच्या देवपूजेलाही 'परवानगी'ची अट का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
कोलकाता : प्रतिनिधी

धार्मिक स्वातंत्र्य हा भारतीय संविधानाने दिलेला मूलभूत अधिकार आहे. मात्र, हा अधिकार वापरताना दुसऱ्याच्या मालमत्तेवरील हक्क, सामायिक जागेचा वापर आणि शांततेचा अधिकार यांचाही विचार करावा लागतो. कोलकाता उच्च न्यायालयाच्या अलीकडील आदेशाने याच मूलभूत संघर्षाकडे लक्ष वेधले आहे. प्रश्न केवळ दुर्गापूजेचा नाही; प्रश्न आहे निवासी इमारतीच्या सामायिक जागेवर धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय नेमका कोण घेणार?

न्यायालयाने निवासी इमारतीतील सामायिक जागेत फ्लॅटधारकांच्या परवानगीशिवाय दुर्गापूजा आयोजित करण्यास पोलिसांनी परवानगी देऊ नये, असे निर्देश दिल्याचे वृत्त आहे. या प्रकरणात काही फ्लॅटधारकांनी सामायिक जागेतील आयोजनाला विरोध केला होता.

इथेच पश्चिम बंगालमधील भाजपच्या राजकारणाकडेही प्रश्न उपस्थित होतो. धर्माच्या नावाने राजकारण करताना 'हिंदू धार्मिक अधिकारांचे रक्षण' हा मोठा दावा केला जातो;

मग सामान्य हिंदू कुटुंबाच्या धार्मिक आचरणासंदर्भात निर्माण होणाऱ्या प्रत्यक्ष प्रश्नांवर सरकारची भूमिका काय? मात्र, या विशिष्ट न्यायालयीन प्रकरणावरून राज्य सरकारने धार्मिक अधिकारांचे संरक्षण केले नाही, असा थेट निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. कारण न्यायालयाचा आदेश मुख्यतः सामायिक मालमत्ता, मालकीहक्क आणि आवश्यक परवानग्या यांच्याशी संबंधित आहे.

कोलकाता उच्च न्यायालयाने यापूर्वीही अशाच स्वरूपाच्या प्रकरणांत परिस्थितीनुसार वेगवेगळे आदेश दिले आहेत. २०१९ मध्ये मालकीहक्काचा प्रश्न असलेल्या जागेवर मालकाची परवानगी नसताना दुर्गापूजा होऊ नये, असे पोलिसांना निर्देश देण्यात आले होते.

दुसरीकडे, २०२३ मध्ये सामायिक जागेवर एकतर्फी दीर्घकाळापासून सुरू असलेल्या दुर्गापूजेच्या प्रकरणात संबंधित प्राधिकरणाची परवानगी असल्याने पूजा रोखण्यास न्यायालयाने नकार दिला आणि केवळ ये-जा अडथळित होणार नाही याची काळजी घेण्यास सांगितले.

म्हणजेच न्यायालयाचा दृष्टिकोन धर्मविरोधी नसून हक्कांचे संतुलन साधणारा आहे. धार्मिक स्वातंत्र्याचा अर्थ दुसऱ्याच्या मालकीच्या किंवा सामायिक जागेवर एकतर्फी अधिकार मिळणे असा होऊ शकत नाही. त्याचवेळी, केवळ धार्मिक कार्यक्रम आहे म्हणून प्रशासनाने मनमानी पद्धतीने त्याला विरोध करणेही योग्य ठरणार नाही.

भाजपशासित राज्यांमध्ये धर्म हा राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू बनतो. त्यामुळे सरकारसमोर खरी कसोटी अशी असते धार्मिक घोषणा करण्यापेक्षा प्रत्येक नागरिकाला समान कायदेशीर संरक्षण मिळते का? एखाद्या समाजाच्या धार्मिक कार्यक्रमाला परवानगी देताना रहिवाशांचे हक्क विचारात घेतले जातात का? आणि दुसऱ्या धर्माच्या कार्यक्रमाबाबतही हेच निकष लागू होतात का?

धर्माच्या नावावर मतांचे राजकारण करणे सोपे; पण धर्मस्वातंत्र्य, मालकीहक्क आणि कायद्याचे राज्य यांचा समान तोल राखणे ही खरी प्रशासनिक परीक्षा आहे. दुर्गापूजा असो वा अन्य कोणताही धार्मिक उत्सवनियम धर्म पाहून नव्हे, तर सर्वांसाठी समान असले पाहिजेत.

## 'लोकशाहीशी खेळणाऱ्यांना सोडणार नाही'; निवडणूक आयोगाविरोधात इंडिया आघाडीचा एल्गार

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली / वृत्तसंस्था

मतदार यादीतील विशेष सखोल पुनरावलोकनावरून पेटलेला वाद आता थेट निवडणूक आयोग आणि केंद्र सरकारविरोधातील राजकीय संघर्षात बदलला आहे. इंडिया आघाडीच्या ३० सप्टेंबरच्या बैठकीनंतर विरोधकांनी २ ते ८ ऑक्टोबरदरम्यान देशव्यापी 'लोकशाही वाचवा' कार्यक्रम जाहीर केला असून, ६ ऑक्टोबरला निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर संयुक्त मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. १ नोव्हेंबरला दिल्लीत मोठी सभा घेण्याचाही निर्णय झाला आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भारतीय लोकशाही कोणत्याही एका व्यक्तीपेक्षा मोठी असल्याचे सांगत, लोकशाहीविरोधी कृत्यांसाठी जबाबदारी निश्चित करण्याची भूमिका मांडली. मतदार याद्यांमध्ये कथित फेरफार आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचा अभाव असल्याचे आरोप विरोधकांकडून सातत्याने केले जात आहेत. निवडणूक आयोगाने मात्र प्रक्रिया कायद्यानुसार असल्याचे स्पष्ट केले असून मतदार यादीतील बदलांच्या सॉफ्टवेअर प्रक्रियेचा आढावा सुरू केला आहे.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर तीव्र आक्षेप नोंदवला. आता विरोधकांनी आंदोलनाची धार वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. प्रश्न केवळ राजकीय आरोपांचा राहिलेला नाही; मतदाराचा हक्क, मतदार यादीची विश्वासार्हता आणि निवडणूक प्रक्रियेवरील सार्वजनिक विश्वास या तीन मुद्द्यांभोवती संघर्ष अधिक तीव्र होत आहे.

## जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा कधी? विधानसभेचा ठराव, केंद्रासमोर आता थेट घटनात्मक कसोटी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
श्रीनगर / वृत्तसंस्था



जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा तातडीने बहाल करण्याची मागणी करणारा ठराव विधानसभेने २८ सप्टेंबरला मंजूर केल्याने केंद्र आणि जम्मू-काश्मीरमधील अधिकारांच्या प्रश्नाला पुन्हा धार आली आहे. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी मांडलेला ठराव भाजप सदस्यांच्या विरोध आणि सभात्यागानंतर आवाजी मतदानाने मंजूर झाला.

मात्र, विधानसभेचा ठराव म्हणजे राज्याचा दर्जा तत्काळ बहाल झालेला नाही. प्रत्यक्ष राज्यनिर्मितीसाठी केंद्र सरकार आणि संसदेकडून आवश्यक घटनात्मक प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. त्यामुळे आता ठरावापेक्षा केंद्राची पुढील भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे.

या प्रकरणाला आणखी गंभीर वळण मिळाले ते प्रशासनाच्या भूमिकेमुळे. मुख्य सचिव अटल डुल्लू आणि कायदा सचिव अचल सेठी यांनी विधानसभा सचिवालयाला पत्रे पाठवून हा विषय न्यायप्रविष्ट असल्याने ठरावावर चर्चा करू नये, अशी भूमिका मांडली होती. विधानसभा अध्यक्षांनी या हस्तक्षेपावर प्रश्न उपस्थित केला.

दरम्यान, ठरावातील काही संदर्भांवरून भाजपने आक्षेप घेतला. काही सदस्यांनी कलम ३७०, ३५-अ आणि २०१९पूर्वीच्या घटनात्मक व्यवस्थेचा संदर्भ देणाऱ्या दुरुस्त्याही मांडल्या. त्यामुळे राज्याचा दर्जा आणि २०१९पूर्वीचा विशेष घटनात्मक दर्जा हे दोन स्वतंत्र प्रश्न पुन्हा चर्चेत आले आहेत. आता विधानसभेचा ठराव केंद्राकडे गेल्यानंतर त्यावर केंद्र सरकार काय भूमिका घेते, याकडे जम्मू-काश्मीरसह देशाचे लक्ष लागले आहे.

## मतदारांनाच कागदपत्रांसाठी धावपळ का? आता बीएलओ घरपोच; एसआयआर प्रक्रियेवर प्रश्न कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई / प्रतिनिधी

विशेष सखोल मतदार पडताळणीच्या प्रक्रियेत निर्माण झालेल्या गोंधळानंतर निवडणूक आयोगाने मतदारांना मोठा दिलासा देत बीएलओंना थेट घरपोच जाण्याचे निर्देश दिले आहेत. नोटीस मिळालेल्या मतदारांकडून आवश्यक कागदपत्रे त्यांच्या घरीच स्वीकारून ती ईसीआयनेटवर अपलोड करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे कागदपत्रे जमा करण्यासाठी मतदारांनी कार्यालयांच्या फेऱ्या मारण्याची गरज राहणार नाही.

महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी ईसीआयनेटमधील काही मर्यादांबाबत निवडणूक आयोगाकडे बदलांची मागणी केली होती. ईआरओंना कायद्याने दिलेला विवेकाधिकार सॉफ्टवेअरच्या प्रक्रियेमुळे मर्यादित होऊ नये, अशी त्यांची भूमिका होती. त्यानंतर आयोगाने ईसीआयनेट प्रणालीचा आढावा घेण्यासाठी समिती स्थापन केली आहे.

दरम्यान, नोटिसांबाबत पुण्यासह काही भागांत मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे वृत्त समोर आले आहे. वेगवेगळ्या बीएलओंकडून मिळणाऱ्या सूचनांमध्ये विसंगती असल्याच्या तक्रारीही नोंदल्या गेल्या आहेत. महाराष्ट्रातील दावे आणि हरकतींची अंतिम मुदत १२ ऑक्टोबरपर्यंत वाढवण्यात आली असून, नोटिसा आणि दावे-हरकती निकाली काढण्याची मुदत १० नोव्हेंबरपर्यंत आहे. अंतिम मतदार यादी १६ नोव्हेंबरला प्रसिद्ध होणार आहे. त्यामुळे आता खरी कसोटी केवळ मतदारांची कागदपत्रे जमा करण्याची नाही, तर प्रत्येक पात्र मतदाराचे नाव अंतिम यादीत सुरक्षित राहते का, याची आहे.

# पदवी मिळाली, पण नियुक्ती नाही; डॉक्टरांना प्रतीक्षेत ठेवणे म्हणजे राष्ट्रीय मनुष्यबळाची नासाडी!

## केरळ उच्च न्यायालयाचा सरकारला आरसा; प्रशासकीय विलंबाचा फटका डॉक्टरांना नव्हे, रुग्णसेवेलाच

■ दैनिक राज्य लोकतंत्र
कोची । प्रतिनिधी

देशात सरकारी रुग्णालयांमध्ये डॉक्टरांची कमतरता असल्याची चर्चा सातत्याने होते. ग्रामीण आणि दुर्गम भागांत तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्याच्या तक्रारी येतात. दुसरीकडे, सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांतून पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलेले प्रशिक्षित डॉक्टर नियुक्तीच्या प्रतीक्षेत बसून राहतात, ही विसंगती गंभीर प्रश्न उपस्थित करणारी आहे. एका बाजूला डॉक्टरांची कमतरता आणि दुसऱ्या बाजूला तयार मनुष्यबळाला प्रशासनाच्या फेऱ्यात अडकवणेही आरोग्यव्यवस्थेची नेमकी कोणती कार्यक्षमता?

केरळ उच्च न्यायालयाने याच प्रश्नावर महत्त्वपूर्ण भूमिका नोंदवत सरकारी वैद्यकीय महाविद्यालयातून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेल्या डॉक्टरांना नियुक्ती न देता प्रतीक्षेत ठेवण्याच्या प्रशासकीय पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. न्यायमूर्ती विजू अब्राहम यांनी दिलेल्या निकालानुसार, अशा डॉक्टरांसाठी बंधनकारक असलेल्या एक वर्षाच्या वरिष्ठ निवासी डॉक्टर सेवाकालाची गणना प्रत्यक्ष नियुक्तीच्या दिवसापासून नव्हे, तर पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा निकाल जाहीर झाल्याच्या दिवसापासून केली जाईल.

या निर्णयामागचा मूलभूत मुद्दा अत्यंत साधा आहे डॉक्टरांनी आपले शिक्षण पूर्ण केले, पात्रता मिळवली आणि रुग्णसेवेसाठी उपलब्ध झाले, तर त्यांना प्रशासकीय विलंबामुळे निष्क्रिय ठेवण्याची जबाबदारी त्यांची का असावी?

सरकारी वैद्यकीय महाविद्यालयातून पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या डॉक्टरांवर वरिष्ठ निवासी डॉक्टर म्हणून सेवा देण्याचे बंधन असते. मात्र अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर नियुक्ती प्रक्रियेला विलंब झाला, तर प्रत्यक्ष सेवेला सुरुवात उशिरा होते. त्याचा परिणाम असा होऊ शकतो की डॉक्टरांना आपल्या सेवाबंधाची मुदत पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त काळ प्रतीक्षा करावी लागेल. न्यायालयाने या परिस्थितीला मान्यता न देता प्रशासकीय विलंबाचा भार संबंधित डॉक्टरांवर टाकण्यास नकार दिला.

यातील सर्वांत महत्त्वाचे निरीक्षण म्हणजे प्रशिक्षित वैद्यकीय मनुष्यबळाला काम न देता बसवून ठेवणे ही राष्ट्रीय मनुष्यबळाची नासाडी ठरू शकते. वैद्यकीय शिक्षणासाठी सार्वजनिक पैसा, महाविद्यालयीन पायाभूत सुविधा, प्राध्यापकांचे श्रम आणि अनेक वर्षांचा विद्यार्थ्यांचा वेळ खर्च होतो. एवढी गुंतवणूक करून तयार झालेला डॉक्टर रुग्णालयात सेवा देण्याऐवजी नियुक्ती आदेशाची वाट पाहत असेल, तर त्याची जबाबदारी केवळ त्या डॉक्टरची कशी असू शकते?

हा प्रश्न केवळ केरळपुरता मर्यादित नाही. देशभरातील सरकारी आरोग्यव्यवस्थेत मनुष्यबळाचे नियोजन, भरती प्रक्रिया आणि रिक्त पदे हा गंभीर विषय आहे. डॉक्टर, परिचारिका, तंत्रज्ञ आणि इतर आरोग्य कर्मचाऱ्यांची उपलब्धता ही केवळ आकडेवारीची बाब नाही; तिचा थेट संबंध रुग्णांच्या उपचारांशी आहे. विशेषतः तज्ज्ञ डॉक्टरांची गरज असलेल्या सरकारी रुग्णालयांमध्ये नियुक्ती प्रक्रियेला अनावश्यक विलंब होत असेल, तर त्याचा परिणाम रुग्णांवर होतो. उपचारासाठी प्रतीक्षा वाढू शकते, बाह्यरुग्ण विभागावरील भार वाढू शकतो आणि उपलब्ध डॉक्टरांवर अतिरिक्त कामाचा ताण येऊ शकतो. म्हणूनच केरळ उच्च न्यायालयाचा निकाल केवळ डॉक्टरांच्या सेवाकालाच्या गणनेपुरता मर्यादित राहत नाही. तो प्रशासनाला एक मूलभूत प्रश्न विचारतोजे मनुष्यबळ तयार केले आहे, त्याचा वेळेत उपयोग करण्याची व्यवस्था सरकारकडे आहे का?

सरकारी यंत्रणेत नियुक्तीची प्रक्रिया आवश्यक आहे; नियम आणि कागदपत्रांची पूर्तताही आवश्यक आहे. मात्र प्रक्रिया ही सेवा देण्यासाठी असते, सेवा रोखण्यासाठी नव्हे. डॉक्टर तयार आहेत, रुग्णालयांना डॉक्टरांची गरज आहे आणि तरीही डॉक्टर नियुक्तीच्या प्रतीक्षेत आहेत, तर समस्या मनुष्यबळाच्या कमतरतेची आहे की प्रशासनाच्या नियोजनाची?

न्यायालयाचा हा निर्णय त्यामुळे आरोग्यव्यवस्थेसाठी व्यापक संदेश देतोप्रशासकीय फाईल पुढे सरकण्यास उशीर झाला म्हणून रुग्णसेवेची गरज थांबत नाही. प्रशिक्षित डॉक्टरांना वेळेत काम मिळाले पाहिजे आणि सरकारी आरोग्यव्यवस्थेलाही त्यांच्या कौशल्याचा वेळेत उपयोग झाला पाहिजे.

## संपादकीय

### सुशिक्षित बेरोजगारांच्या फसवणुकीचा बुरखा फाटला!

**नोकरीच्या आशेवर कोट्यवधींची लूट; बनावट नियुक्तीपत्रांपासून वेतनपत्रिकांपर्यंतचा धक्कादायक खेळ**

नोकरीच्या शोधात असलेल्या सुशिक्षित तरुणाच्या हातात पदवी असते, पण रोजगाराची हमी नसते. सरकारी नोकरी म्हणजे स्थैर्य, प्रतिष्ठा आणि कुटुंबाच्या भविष्याची सुरक्षितता, अशी त्याची स्वाभाविक अपेक्षा असते. याच आशेचा गैरफायदा घेत पुणे महानगरपालिकेत नोकरी लावून देण्याच्या नावाखाली तरुणांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या कथित रॅकेटचा पर्दाफाश झाला आहे. जेजुरी येथील श्री मार्तंड देवस्थानचे माजी विश्वस्त राजेंद्र बबन खेडेकर यांना शिवाजीनगर पोलिसांनी अटक केली असून, न्यायालयाने त्यांना ३ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

या प्रकरणाची धक्कादायक बाजू म्हणजे फसवणूक केवळ 'नोकरीचे आश्वासन' देऊन थांबलेली दिसत नाही. बनावट नियुक्तीपत्रे, महापालिकेचे शिक्के, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बनावट स्वाक्षऱ्या, ओळखपत्रे, सेवा पुस्तिका, वैद्यकीय कागदपत्रे आणि वेतनपत्रिका तयार करून उमेदवारांना नोकरी लागल्याचा आभास निर्माण केल्याचे तपासातील वृत्त आहे. काही प्रकरणांत खात्यात पगार जमा झाल्याचा भास निर्माण करण्यापर्यंतचा प्रकार झाल्याचेही समोर आले आहे.

सुरुवातीला ४५ लाख रुपयांच्या फसवणुकीची माहिती समोर आली होती. मात्र पुढील तपासात किमान १४ पेक्षा अधिक उमेदवारांची फसवणूक करून सुमारे पावणेतीन कोटी रुपये उकळल्याचे वृत्त आहे. यापूर्वीच्या स्वतंत्र प्रकरणात दहा तरुणांकडून तब्बल १ कोटी ५ लाख ५० हजार रुपये उकळल्याचे आणि आरोपींकडून महापालिकेच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचे ११ बनावट रबरी शिक्के तसेच लॅपटॉपमधील ६० पेक्षा अधिक संशयास्पद फाइल्स आढळल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. त्यामुळे हा प्रकार एखाद्या व्यक्तीपुरता मर्यादित आहे की त्यामागे व्यापक जाळे आहे, हा तपासाचा महत्त्वाचा मुद्दा ठरतो.

या प्रकरणात महापालिकेच्या शिक्षण विभागातील शिपाई शिवानंद बाळासाहेब पाटील आणि नमिता गोवर्धन बनसोडे यांच्यासह इतरांवरही गुन्हा दाखल आहे. त्यामुळे सर्वात मोठा प्रश्न असा आहे की, महापालिकेच्या अधिकृत कागदपत्रांचा नमुना, शिक्के, अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आणि प्रशासकीय प्रक्रियेची इतकी माहिती आरोपींपर्यंत पोहोचली कशी? बनावट कागदपत्रे तयार करणारे कोण? त्यांचा वापर कुठे-कुठे झाला? किती तरुणांकडून पैसे घेतले गेले? आणि या पैशांचा नेमका प्रवास कुठे झाला? या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर तपासातून बाहेर येणे आवश्यक आहे.

याहून गंभीर प्रश्न महापालिका प्रशासनाच्या नियंत्रणव्यवस्थेवरही उपस्थित होतो. एखाद्या उमेदवाराला नियुक्तीपत्र मिळते, ओळखपत्र मिळते, सेवा पुस्तिका तयार होते, वैद्यकीय कागदपत्रे दिली जातात आणि वेतन मिळाल्याचा भास निर्माण केला जातो, तर एवढ्या टप्प्यांवर कोणतीही पडताळणी झाली नाही का? जर झाली असेल तर बनावटपणा पकडला का गेला नाही? आणि झाली नसेल तर भरती प्रक्रियेतील अंतर्गत नियंत्रण किती सक्षम आहे?

सरकारी नोकरीच्या नावाखाली पैसे देणे ही स्वतःच धोकादायक प्रवृत्ती आहे. मात्र बेरोजगारी, स्पर्धात्मक परीक्षांची वाढती स्पर्धा आणि सरकारी नोकरीबद्दलची तीव्र अपेक्षा यामुळे फसवणूक करणाऱ्यांना संधी मिळते. त्यामुळे तरुणांनी कोणत्याही व्यक्तीच्या ओळखीवर किंवा प्रतिष्ठेवर विश्वास ठेवून पैसे देण्याऐवजी अधिकृत जाहिरात, निवड यादी, नियुक्ती आदेश आणि महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरील माहिती तपासणे आवश्यक आहे.

पोलिसांनी या प्रकरणाचा तपास केवळ अटक आणि कागदपत्रांच्या जप्तीपुरता मर्यादित ठेवू नये. या रॅकेटमध्ये आणखी किती लोक सहभागी आहेत, किती उमेदवारांची फसवणूक झाली आहे आणि महापालिकेतील कोणत्या यंत्रणेचा गैरवापर झाला, याचा पूर्ण माग काढला पाहिजे. त्याचबरोबर फसवणूक झालेल्या तरुणांना कायदेशीर मदत आणि त्यांच्या पैशांच्या मागोव्याबाबतही स्पष्ट कार्यवाही झाली पाहिजे.

नोकरी ही तरुणाच्या भविष्याची आशा असते; ती आशा विकण्याचा अधिकार कोणालाही नाही. पुणे महापालिका असो किंवा अन्य कोणतीही सरकारी संस्थाभरती प्रक्रियेतील पारदर्शकता, डिजिटल पडताळणी आणि जबाबदारी निश्चित करण्याची यंत्रणा मजबूत करणे ही काळाची गरज आहे. या प्रकरणातील सत्य पूर्णपणे समोर येईल आणि दोष सिद्ध झालेल्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई होईल, अशी अपेक्षा आहे. कारण या प्रकरणात केवळ काही तरुणांचे पैसे गेलेले नाहीत; सरकारी नोकरीच्या नावावर नागरिकांच्या विश्वासालाच तडा गेला आहे.

# जीआरचा आदेश असतानाही मानधन रखडले; अंशकालीन निदेशकांचा सवाल!

## मार्चपासून एकही रुपया नाही; १५ सप्टेंबरपर्यंत देयक अदा करण्याचे निर्देश असतानाही प्रशासनाची दिरंगाई

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये कला, क्रीडा आणि कार्यानुभव विषयाचे अध्यापन करणाऱ्या अंशकालीन निदेशकांचे मार्च २०२६ पासूनचे मानधन अद्याप थकीत असल्याने संबंधित शिक्षकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या प्राथमिक शिक्षण संचालनालयाने ३ सप्टेंबर २०२६ रोजी मानधन नियमितपणे अदा करण्याचे स्पष्ट निर्देश दिले असतानाही त्याची प्रभावी अंमलबजावणी झालेली नसल्याचा आरोप निदेशकांकडून करण्यात येत आहे.

शासनाच्या निर्देशानुसार शाळांमधील अंशकालीन निदेशकांचे मानधन नियमितपणे अदा करावे, पुढील महिन्याचे बिल तयार करून ते तातडीने कोषागारात सादर करावे आणि मानधनाची रक्कम संबंधितांच्या बँक खात्यात छएत्र्छ/ठढत्रहडरे थेट जमा करावी, असे स्पष्ट करण्यात आले होते. तसेच मार्च ते ऑगस्ट २०२६ या कालावधीतील थकीत मानधन १५ सप्टेंबर २०२६पूर्वी अदा करण्याचे निर्देश देण्यात आले होते.



मात्र सप्टेंबर महिना संपत आला तरी मार्चपासून मानधन मिळालेले नसल्याने अंशकालीन निदेशकांपुढे आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. शाळेतील कला, क्रीडा आणि कार्यानुभव शिक्षणाची जबाबदारी पार पाडणाऱ्या या शिक्षकांना त्यांच्या कामाचा मोबदला वेळेवर मिळत नसेल, तर शासनाच्या आदेशांचा उपयोग नेमका कशासाठी, असा सवाल उपस्थित होत आहे.

शासनाने आदेश काढल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित शिक्षण विभाग आणि स्थानिक प्रशासनाची असते. मग ३ सप्टेंबरचा आदेश असताना १५ सप्टेंबरपर्यंत मानधन देण्याची प्रक्रिया पूर्ण का झाली नाही? देयके तयार करण्यात अडचण आहे का, निधी उपलब्ध नाही का, की प्रशासकीय पातळीवरच दिरंगाई होत आहे? याबाबत संबंधित विभागाने स्पष्ट भूमिका मांडणे आवश्यक आहे.

अंशकालीन निदेशकांचे मानधन हे केवळ प्रशासकीय नोंदीतील एक देयक नसून त्यांच्या कुटुंबाच्या दैनंदिन गरजांशी संबंधित उत्पन्नाचा स्त्रोत आहे. महिनोनमहिने मानधन रखडणे म्हणजे संबंधित शिक्षकांवर आर्थिक भार टाकण्यासारखेच आहे. शासनाने नियमित मानधन देण्याचे निर्देश दिल्यानंतरही प्रत्यक्ष खात्यात रक्कम जमा होत नसेल, तर आदेश आणि अंमलबजावणी यांच्यातील दरी स्पष्ट होते.

निदेशकांनी थकीत मानधन तातडीने अदा करण्याची मागणी केली आहे. त्याचबरोबर भविष्यात मानधनासाठी वारंवार पाठपुरावा करण्याची वेळ येऊ नये, यासाठी कायमस्वरूपी आणि नियमित आर्थिक व्यवस्था निर्माण करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

शिक्षणव्यवस्थेत कला, क्रीडा आणि कार्यानुभव या विषयांचे महत्त्व सातत्याने अधोरेखित केले जाते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी या विषयांची गरज मान्य केली जाते. मात्र हे विषय शिकविणाऱ्या शिक्षकांचेच मानधन महिनोनमहिने थकीत राहणार असेल, तर या धोरणातील विसंगतीकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

# महापालिका सेवेतून २१ अधिकारी-कर्मचारी सेवानिवृत्त

## १९ नियत वयोमानानुसार; दोघांनी स्वीकारली स्वेच्छानिवृत्ती

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

वर्षानुवर्षे निष्ठा, शिस्त आणि कर्तव्यभावनेने शहराची सेवा करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या योगदानामुळेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिका भक्कमपणे उभी आहे, असे प्रतिपादन सहआयुक्त मनोज लोणकर यांनी केले.

महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत मधुकर पवळे सभागृहात सप्टेंबर २०२६ अखेर सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले १९ आणि स्वेच्छानिवृत्ती घेतलेले २, अशा एकूण २१ अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सहआयुक्त मनोज लोणकर यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.



यावेळी लोणकर यांनी सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांनी महापालिका सेवेत बजावलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. विविध विभागांमध्ये काम करताना त्यांनी शहराच्या प्रशासनाला आणि नागरिकसेवेला दिलेले योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले.

सप्टेंबर २०२६ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्यांमध्ये उपअभियंता गणेश राऊत, कार्यालय अधीक्षक रमेश यादव, मुख्याध्यापक पुष्पा शिंदे, रजनी आहेर, अनुजा सोनगरे, मुख्य लिपिक रामू गेंगजे, रोहिणी ढेंबरे, सिस्टर इनचार्ज पौर्णिमा आमले, जलधारा टिपले, कॉम्प्युटर ऑपरेटर अरुण गुंडगळ, उपशिक्षक नीलिमा भांबेरे, सुनिता शेजवळ, रखवालदार बाळू लांडगे, लिफ्टमन विलास गायकवाड, मजूर हंसराज सजनियाल, लक्ष्मण मानमोडे, पांडुरंग गवारी, सफाई कामगार सविता काळभोर आणि नंदकुमार भोंडवे यांचा समावेश आहे.

तर सफाई कामगार राजेश गंगावणे आणि कचरा कुली गणेश यादव यांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली.

या सत्कार सोहळ्यास मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, मुख्य लिपिक माया वाकडे, नंदकुमार इंदलकर यांच्यासह विविध विभागांतील अधिकारी-कर्मचारी तसेच सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप यांनी केले. जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# कोणी कोणती जागा लढवायची याचा निर्णय नेत्यांवर : रवींद्र चव्हाण

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीतील चार जागांबाबत कोणी कोणती जागा लढवायची याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार घेतील. मात्र, भाजप संघटनात्मक तयारीला लागला असून मतदार नोंदणीपासून ते मतदारांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचवण्याच्या नियोजनापर्यंत तयारी सुरू केली आहे, अशी माहिती भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मंगळवारी (दि. २९) पत्रकारांना दिली.

महापालिका निवडणुकीनंतर चव्हाण यांनी पहिल्यांदाच शहरासाठी एक पूर्ण दिवस दिला. त्यांच्या उपस्थितीत पिंपरी आणि चिंचवडमध्ये दोन रोजगार मेळावे, माथाडी कामगार मेळावा, वाकडला संकल्प शिबिर आणि सकाळी कोअर समितीची बैठक झाली. बैठकीनंतर चव्हाण यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

चव्हाण म्हणाले की, पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ निवडणुकीसाठी भाजपने तयारी सुरू केली आहे. विदर्भापासून पश्चिम महाराष्ट्रापर्यंत होणाऱ्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार नोंदणी केली आहे. मंडलाध्यक्ष आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांना जबाबदाऱ्या देण्यात आल्या असून, यासंदर्भात ऑनलाइन बैठकांचेही आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली सरकार काम करत असून, वरिष्ठ नेतृत्व जो निर्णय घेईल, त्याच दिशेने पक्षाची संघटना आणि कार्यकर्ते पुढे जातील. चव्हाण म्हणाले की, दुष्काळजन्य परिस्थिती, शेतकरी आणि महाराष्ट्रासमोरील विविध आव्हानांवर सरकार काम करत आहे, राजकारणापेक्षा जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य दिले जात आहे.

# म्हाळुंगे येथे जागेवर बेकायदेशीर ताबा मिळवून तोडफोड; ४० ते ५० जणांच्या टोळक्यासह दोघांवर बावधन पोलिसांत गुन्हा दाखल!

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**बावधन / पुणे: प्रतिनिधी**

म्हाळुंगे परिसरातील सर्व्हे नंबर ९/१० मधील मिळकतीवर बेकायदेशीर जमाव जमवून अतिक्रमण करणे, जागेवरील बोर्ड तोडून नुकसान करणे तसेच पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने सीसीटीव्ही कॅमेरे तोडफोड केल्याप्रकरणी बावधन पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी श्री. अरुण वैगुनाथ खराडे पाटील, प्रसाद अरुण खर्डे पाटील आणि इतर ४० ते ५० अनोळखी इसमांवर भारतीय न्याय संहिता व भा.दं.वि. च्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत बांधकाम व्यावसायिक अभि विजय रोदळ (वय ३३ वर्षे, रा. मॅनहॅटन, पल्लोड फार्म, बाणेर) यांनी फिर्याद दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २७ जुलै रोजी सकाळी ६:०० ते दुपारी १२:०० वाजेदरम्यान म्हाळुंगे येथील सर्व्हे नंबर ९/१० मधील फिर्यादी यांच्या जागेत आरोपींनी ४० ते ५० जणांचा बेकायदेशीर जमाव आणला. त्यानंतर फिर्यादीच्या जागेवर जबरदस्तीने अतिक्रमण करत तेथील बोर्ड तोडून नुकसान केले. एवढेच नव्हे तर जागेच्या सुरक्षेसाठी लावण्यात आलेली सीसीटीव्ही कॅमेरे आणि संपूर्ण संगणकीय निगराणी यंत्रणा जाणीवपूर्वक नष्ट करून इलेक्ट्रॉनिक पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी बावधन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक सुरासे व पोलीस निरीक्षक ठाकूर पुढील तपास करत आहेत.

**वाकड-भुजबळ चौक रस्त्यावर भरधाव अल्टो कारने दुचाकीला उडवले; विद्यार्थी जखमी:**

वाकड चौकाकडून भुजबळ चौकाकडे जात असताना लाल रंगाच्या मारुती सुझुकी अल्टो कारचालक (एमएच १४ एमव्ही ९५४१) अज्ञात महिलेने अविचाराने व भरधाव वेगाने गाडी चालवून समोर चाललेल्या ज्युपिटर स्कुटरला जोरदार धडक दिली. या अपघातात मानसिंग पवनसिंग शेखावत (वय २१, रा. पिंपरी-चिंचवड लिंक रोड) हा बीबीए विद्यार्थी जखमी झाला असून दुचाकीचे मोठे नुकसान झाले आहे. वाकड पोलिसांनी अज्ञात महिला चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

**सांगवीत कार लोन क्लोज करण्याच्या बहाण्याने महिलेची २.२२ लाखांची फसवणूक:**

स्वतःला एचडीएफसी बँक बंडगार्डन शाखेचा कर्मचारी असल्याचे भासवून श्रुतीक सदानंद कासारे (रा. बदलापूर, ठाणे) याने ४४ वर्षीय महिलेचा विश्वास संपादन केला. कार लोन क्लोज करण्याचे खोटे आश्वासन देऊन वेगवेगळ्या खात्यांवरून एकूण २ लाख २२ हजार ४७४ रुपये उकळले व फसवणूक केली. याप्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सफाई मित्र सुरक्षा शिबिरात ३,५०० हून अधिक सफाई सेवकांची आरोग्य तपासणी

## 'स्वच्छता ही सेवा २०२६' अभियानांतर्गत आरोग्य तपासणीसह सुरक्षा साधनांचे वाटप

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

शहराच्या स्वच्छतेची जबाबदारी पार पाडणाऱ्या सफाई सेवकांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेला प्राधान्य देत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे 'स्वच्छता ही सेवा २०२६' अभियानांतर्गत सफाई मित्र सुरक्षा शिबिरांचे आयोजन करण्यात आले. २८ आणि ३० सप्टेंबर रोजी झालेल्या या शिबिरांमध्ये महापालिकेच्या दहा क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रातील ३,५०० हून अधिक सफाई सेवकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

थेरगाव येथील स्व. कै. शंकरराव गावडे कामगार भवन येथेही शिबिर घेण्यात आले. यावेळी सफाई सेवकांची हिमोग्लोबिन, रक्तदाब, मधुमेह आदींची मोफत तपासणी करण्यात आली. तसेच संतुलित आहार, नियमित व्यायाम, योगासने, प्राणायाम, ताणतणावाचे व्यवस्थापन आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

कामाच्या स्वरूपानुसार आवश्यक सुरक्षा साधनांचा वापर करणे, आरोग्यविषयक चांगल्या सवयी अंगीकारणे तसेच आजाराची प्राथमिक लक्षणे दिसताच वैद्यकीय सल्ला घेण्याचे आवाहन सफाई सेवकांना करण्यात आले.




सफाई सेवक हे शहराच्या स्वच्छतेतील महत्त्वाचे घटक आहेत. कामाच्या स्वरूपानुसार आवश्यक सुरक्षा साधनांचा वापर करण्याबरोबरच नियमित आरोग्य तपासणी करणेही महत्त्वाचे आहे. आरोग्यविषयक समस्या सुरुवातीच्या टप्प्यात लक्षात आल्यास वेळेत उपचार करता येतात. त्यामुळे सफाई मित्रांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देण्यात येत आहे, असे उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.

दरम्यान, कचरा वेचकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत डॉ. ठेंगल यांच्या हस्ते सुरक्षा साधनांचे वाटप करण्यात आले.

महिला योजनांचीही माहिती

शिबिराच्या माध्यमातून समाज विकास विभागाच्या महिला व बालकल्याण योजनांची माहितीही देण्यात आली. महिला बचतगट, विधवा व घटस्फोटित महिलांसाठी स्वयंरोजगार, कौशल्य व व्यवसाय प्रशिक्षण तसेच विविध आर्थिक सहाय्य योजनांची माहिती देऊन पात्र महिलांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

आर्थिक सहाय्य, कौशल्य प्रशिक्षण आणि स्वयंरोजगाराच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्याचा विविध योजनांचा उद्देश आहे. या योजनांचा लाभ गरजू महिलांपर्यंत पोहोचल्यास त्यांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणास मदत होईल, असे डॉ. ठेंगल यांनी नमूद केले.

शिबिरास डॉ. शिवाजी ढगे, डॉ. शंकर मोसलगी, डॉ. कुलभूषण कुलकर्णी, डॉ. तुषार जाधव, सहायक आरोग्य अधिकारी श्रीराम गायकवाड, राजेश भाट, अंकुश झिटे, अतुल सोनवणे, कांचनकुमार इंदलकर, योगेश फल्ले यांच्यासह आरोग्य निरीक्षक, अधिकारी, कर्मचारी आणि सफाई सेवक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अक्षय पाटील यांनी केले, तर सहायक आरोग्य अधिकारी श्रीराम गायकवाड यांनी आभार मानले.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना मोठा दिलासा...! २६५ तालुक्यांत दहावी-बारावीचे परीक्षा शुल्क माफ; मंडळाचा मोठा निर्णय

■ पुणे : प्रतिनिधी

राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे आगामी फेब्रुवारी-मार्च २०२७ च्या इयत्ता दहावी आणि बारावी परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क न घेता आवेदनपत्रे भरून घ्यावीत, असे निर्देश महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने परिपत्रकाद्वारे दिले आहे. याबाबतच्या सविस्तर सूचना लवकरच निर्गमित करण्यात येतील, असेही पत्रकात नमूद केले आहे.

राज्यातील सर्व विभागीय मंडळांनी आपापल्या भागातील दुष्काळग्रस्त तालुक्यातल्या सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना वरील सूचना तात्काळ द्यावी. तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य मंडळास तातडीने सादर करावा, असे निर्देश राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी दिले आहेत.

दरम्यान, राज्यात सर्वत्र दुष्काळ पडलेला असतानाही महाविद्यालयांकडून परीक्षा शुल्काचा तगादा लावला जात असल्याने तीव्र नाराजी व्यक्त केली जात होती. या पार्श्वभूमीवर राज्य मंडळाने परिपत्रक काढून दिलासा दिला आहे.

अधिक माहितीनुसार, पत्र क्रमांक १ आणि २ अन्वये फेब्रुवारी-मार्च २०२७ मधील महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र अर्थात इयत्ता दहावी आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र अर्थात बारावीच्या परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षांची आवेदनपत्रे ऑनलाइन पद्धतीने भरून घेण्याबाबत सविस्तर सूचना निर्गमित केलेल्या आहेत. मात्र, राज्य सरकारने दि. २५ सप्टेंबर रोजी राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्याचे स्पष्ट केले आहे.

# आई-वडिलांच्या स्मरणार्थ खडकवाडी ग्रामस्थांची सामूहिक चौथभरणी

## पितृपंधरवड्यानिमित्त उपक्रम; 'एक गाव, एक विचार आणि एकजूट'चा प्रत्यय

■ दैनिक राज्य लोकतंत्र
लोणी-धामणी प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यातील खडकवाडी येथे पितृपंधरवड्याचे औचित्य साधून ग्रामस्थांच्या वतीने दिवंगत आई-वडील व पूर्वजांच्या स्मरणार्थ सामूहिक चौथभरणीचा उपक्रम राबविण्यात आला. गावातील सर्व ग्रामस्थांनी एकत्र येत धार्मिक परंपरेला सामाजिक एकतेची जोड देत हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडला.

पितृपंधरवडा हा पूर्वजांचे स्मरण करून त्यांच्या ऋणाची जाणीव ठेवण्याचा काळ मानला जातो. याच भावनेतून खडकवाडी ग्रामस्थांनी प्रत्येक कुटुंबाने स्वतंत्रपणे चौथभरणी करण्याऐवजी सामूहिक पद्धतीने कार्यक्रम घेण्याचा निर्णय घेतला. या उपक्रमातून पूर्वजांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याबरोबरच गावातील सामाजिक सलोखा आणि परस्पर सहकार्याची भावना अधोरेखित झाली.



खडकवाडी गावात सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रम सामूहिक सहभागातून राबविण्याची परंपरा आहे. 'एक गाव, एक विचार आणि एकजूट' ही गावाची ओळख असून, सामूहिक चौथभरणीच्या माध्यमातून त्याचा पुन्हा एकदा प्रत्यय आला.

या कार्यक्रमात ग्रामस्थांनी आपल्या आई-वडिलांसह पूर्वजांचे स्मरण करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. जीवन घडविण्यासाठी आई-वडिलांनी केलेला त्याग, दिलेले संस्कार आणि कुटुंबाच्या जडणघडणीत त्यांचे योगदान यांची आठवण या निमित्ताने जागविण्यात आली. धार्मिक परंपरेसोबतच सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक तसेच ग्रामस्थांनी या सामूहिक उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. अशा उपक्रमांमुळे गावातील आपुलकीचे संबंध अधिक दृढ होतात, तसेच नवीन पिढीला आपल्या परंपरा, संस्कार आणि पूर्वजांविषयी आदराची जाणीव होते, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

धार्मिक परंपरेला सामाजिक एकतेची जोड देत ग्रामस्थांनी राबविलेला हा उपक्रम 'गावाच्या एकजुटीतून समाजहित' या भावनेचा आदर्श आहे, असे खडकवाडीचे माजी सरपंच अनिल डोके यांनी 'दैनिक राज्य लोकतंत्र'शी बोलताना सांगितले.

# थोरात मळ्यात बिबट्याचा मेंढ्यांच्या गोठ्यावर हल्ला; दोन मेंढ्या ठार

## ८० ते ९० हजारांचे नुकसान; पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मंचर : प्रतिनिधी

निरगुडसर-मेंगडेवाडी रस्त्यालगत थोरात मळा परिसरात बिबट्याने मेंढ्यांच्या गोठ्यावर हल्ला करून दोन मेंढ्या ठार केल्याची घटना बुधवारी पहाटे घडली. या घटनेमुळे परिसरातील पशुपालक शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.

**पशुपालकांनी सतर्क राहावे**

निरगुडसर येथील घटनेची वनविभागाने दखल घेतली असून घटनास्थळी पंचनामा करण्यात आला आहे. परिसरात बिबट्याचा वावर असल्याने नागरिकांनी व पशुपालकांनी सतर्क राहावे. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही वनविभागाकडून करण्यात येईल. पशुधनाच्या सुरक्षिततेसाठी रात्रीच्या वेळी गोठ्यांमध्ये पुरेशी सुरक्षा व्यवस्था ठेवावी.

**- विकास भोसले, वनपरिक्षेत्र अधिकारी, मंचर**

कैलास शांताराम सुडके यांचा थोरात मळा परिसरात मेंढ्यांचा गोठा आहे. बुधवारी पहाटे सुमारे चार वाजता मेंढ्यांच्या पळण्याचा व ओरडण्याचा आवाज ऐकून सुडके गोठ्याकडे धावले. त्यावेळी बिबट्या एका मेंढीला उचलून कंपाउंडवरून पळून जाताना दिसला.

त्यानंतर गोठ्यात पाहणी केली असता ब्रिडिंगसाठी आणलेला सुमारे ६० हजार रुपये किमतीचा मोठा नर मेंढा बिबट्याच्या हल्ल्यात ठार झाल्याचे आढळले. याशिवाय आणखी एका मेंढीचाही मृत्यू झाला. या हल्ल्यात सुडके यांचे अंदाजे ८० ते ९० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच मिलिंद वळसे पाटील यांनी निरगुडसर येथील रेस्क्यू टीमचे सदस्य डॉ. अतुल साबळे यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर वनविभागाच्या वनरक्षक अश्विनी डफळ, वनमजूर मेंगडे तसेच ग्रामस्थांच्या उपस्थितीत घटनास्थळी पंचनामा करण्यात आला.

परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. रात्रीच्या वेळी गोठ्यांमध्ये बांधलेल्या पशुधनाच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, बिबट्याच्या हल्ल्याच्या घटना रोखण्यासाठी वनविभागाने तातडीने पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी पंचक्रोशीतील शेतकरी व पशुपालकांनी केली आहे.

# खडकवाडीचे आदर्श शिक्षक समीर जाधव यांना 'नेशन बिल्डर अवॉर्ड २०२६'

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रमांची दखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र
लोणी-धामणी : प्रतिनिधी

खडकवाडी (ता. आंबेगाव) येथील जिल्हा परिषद मॉडेल स्कूलमधील आदर्श शिक्षक समीर जाधव यांना त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाबद्दल शरयू टोयोटो कंपनीच्या वतीने 'नेशन बिल्डर अवॉर्ड २०२६' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. 'शिवनेर भूषण' माजी सैनिक रमेश खरमाळे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकापुरते ज्ञान न देता त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी समीर जाधव सातत्याने विविध उपक्रम राबवत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मंथन, अभिरूप, एनएमएमएस आणि नवोदय यांसारख्या विविध स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळविले आहे. २८ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत, १८ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत, तर १४ विद्यार्थी केंद्र गुणवत्ता यादीत स्थान मिळविण्यात यशस्वी झाले आहेत.

अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळावा यासाठी सुंदर हस्ताक्षर, वक्तृत्व स्पर्धा, 'चालता-बोलता मिळवा' प्रश्नमंजुषा, मराठी-इंग्रजी श्रुतलेखन तसेच विविध कला व क्रीडा स्पर्धांसाठीही त्यांनी उपक्रम राबविले.

शाळेच्या भौतिक सुविधांच्या विकासासाठीही विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने विविध उपक्रम साकारण्यात आले आहेत. यामध्ये भव्य शिवसृष्टी, डिजिटल स्कूल आणि बॉटनिकल गार्डन यांसारख्या उपक्रमांचा समावेश आहे. शाळेच्या शैक्षणिक वातावरणासोबतच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला आहे.

समीर जाधव यांच्या या शैक्षणिक कार्याची दखल घेत त्यांना 'नेशन बिल्डर अवॉर्ड २०२६' प्रदान करण्यात आला. पुरस्कार मिळाल्याबद्दल खडकवाडी शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले.

# आमदारांच्या शाळेच्या वसतिगृहातून दहावीचे तीन विद्यार्थी बेपत्ता; सुरक्षाव्यवस्थेवर गंभीर प्रश्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र
माजलगाव / प्रतिनिधी

माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके अध्यक्ष असलेल्या सिंधफणा पब्लिक स्कूलच्या वसतिगृहातून दहावीचे तीन विद्यार्थी एकाच वेळी बेपत्ता झाल्याने खळबळ उडाली आहे. ३० सप्टेंबरच्या रात्री जेवणानंतर नियमित हजेरी घेताना तिन्ही विद्यार्थी त्यांच्या खोलीत अथवा वसतिगृह परिसरात आढळून आले नाहीत. त्यामुळे वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा आणि प्रशासनाच्या देखरेखीचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे.

शाळेचे प्राचार्य शेख अन्वर यांच्या माहितीनुसार, बेपत्ता विद्यार्थ्यांमध्ये अभिजीत श्रीनिवास राठोड (१५, ओंकार नगर, पाथरी, जि. परभणी), दिनेश विठ्ठल चव्हाण (१६, चंद्रभान तांडा, नित्रुड, ता. माजलगाव) आणि तेजस संतोष चव्हाण (१५, कोकाटे हातगव्हाण, ता. परतूर, जि. जालना) यांचा समावेश आहे.

रात्रीच्या जेवणानंतर हजेरीवेळी विद्यार्थी गायब असल्याचे लक्षात आल्यानंतर प्रशासनाने वसतिगृह, मैदान आणि परिसरात शोधमोहीम सुरू केली. मात्र, बराच वेळ शोध घेऊनही तिघांचा ठावठिकाणा लागलेला नाही.

घटनेची माहिती मिळताच पालकांनी शाळेत धाव घेतली. तीन अल्पवयीन विद्यार्थी एकाच वेळी वसतिगृहातून बेपत्ता होणे ही केवळ चिंता निर्माण करणारी घटना नाही, तर वसतिगृहातील सुरक्षा व्यवस्था, विद्यार्थ्यांची निगराणी आणि प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करणारी बाब आहे. विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू असून, पुढील तपासात नेमके काय घडले हे स्पष्ट होणार आहे.

# मित्रांनी जपला माणुसकीचा धर्म

## कर्त्या व्यक्तीच्या निधनानंतर सय्यद कुटुंबाला आर्थिक मदतीचा हात; आठवड्यात २ लाख ६८ हजारांची मदत

■ दैनिक राज्य लोकतंत्र
लोणी-धामणी : प्रतिनिधी

लोणी (ता. आंबेगाव) येथील शकील शब्बीर सय्यद (वय ३५) यांचे रविवारी (दि. १३) बेल्हा-जेजुरी राज्यमार्गावर पाबळ येथे दुचाकी अपघातात निधन झाले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी आणि तीन मुले असा परिवार आहे. घरातील कर्त्या व्यक्तीच्या आकस्मिक निधनामुळे सय्यद कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळले.

या कठीण प्रसंगी मित्रमंडळी आणि ग्रामस्थांनी पुढाकार घेत सय्यद कुटुंबाच्या मदतीसाठी हात पुढे केला. लोणी ग्रामस्थ, मित्रमंडळी, नातेवाईक तसेच सुधीर आढाव मित्र परिवार आणि इमत्ता दहावी २००९-१० बॅचच्या वतीने सोशल मीडियाच्या माध्यमातून आर्थिक मदतीचे आवाहन करण्यात आले. त्याला प्रतिसाद देत अवघ्या एका आठवड्यात २ लाख ६८ हजार १११ रुपये जमा झाले.

यामध्ये सुधीर आढाव मित्रमंडळाने १ लाख ८ हजार ४३२ रुपये, तर अन्य मित्रमंडळी आणि नागरिकांनी आपल्या परीने आर्थिक योगदान दिले. अनिकेत नाईक, सागर गायकवाड, सुधीर आढाव, चेतन लोखंडे, अख्तर मोमीन यांच्यासह परिसरातील तरुणांनी मदत उभारण्यासाठी विशेष पुढाकार घेतला.

जमा झालेली रक्कम सर्वांच्या संमतीने सय्यद कुटुंबाच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन बँकेत मुदतठेवीच्या स्वरूपात ठेवण्यात आली. तसेच १८ हजार १११ रुपये कुटुंबीयांकडे रोख स्वरूपात सुपूर्द करण्यात आले.

शकील सय्यद यांच्या आकस्मिक निधनाने कुटुंबावर आलेल्या संकटाच्या काळात मित्रमंडळी, ग्रामस्थ आणि नातेवाईकांनी आर्थिक मदतीसह मानसिक आधारही दिला. कोणताही भेद न ठेवता दुःखाच्या प्रसंगी कुटुंबाच्या पाठीशी उभे राहिल्याने सामाजिक सलोखा आणि माणुसकीची भावना अधोरेखित झाली.

संकटाच्या काळात एकमेकांच्या मदतीला धावून जाण्याची ही भावना 'सर्व धर्म समभाव' आणि सामाजिक एकतेचा प्रत्यक्ष अनुभव देणारी ठरली आहे. सय्यद कुटुंबाला मिळालेल्या या मदतीमुळे परिसरातील तरुणांच्या सामाजिक बांधिलकीचेही दर्शन घडले.

# कर्मवीरांच्या विचारांचा वारसा विद्यार्थ्यांनी जपावा : प्राचार्य डॉ. पांडुरंग भोसले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर : देश पारतंत्र्यात असताना कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शैक्षणिक चळवळ उभी करून शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचा पाया घातला. समाजातील जात-धर्माची उतरंड मोडून समता, शिक्षण आणि स्वावलंबनाचा विचार त्यांनी रुजविला. कर्मवीरांच्या या विचारांचा वारसा विद्यार्थ्यांनी केवळ भाषणांपुरता न ठेवता आपल्या आचरणातून आणि कृतीतून जपला पाहिजे, असे प्रतिपादन अण्णासाहेब आवटे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पांडुरंग भोसले यांनी केले.



अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर येथे रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

प्राचार्य डॉ. भोसले म्हणाले की, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी राजर्षी शाहू महाराज आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या समतावादी विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड दिली. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, हा विचार त्यांनी सामान्य जनतेपर्यंत पोहोचविला. विद्यार्थ्यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊन 'रयत'चा विद्यार्थी म्हणून स्वतःला सिद्ध करावे. स्पर्धा परीक्षा, विविध व्यवसाय तसेच अन्य क्षेत्रांत यश संपादन करून समाजाच्या विकासात योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांनी परंपरागत व्यवस्था आणि रूढींना प्रश्न विचारत कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासह अनेक समाजसुधारकांनी परिवर्तनाची चळवळ उभी केली, असे सांगितले. जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन सामान्य माणसाच्या हिताचा विचार करणाऱ्या महापुरुषांचे विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत. विवेकनिष्ठ विचार, बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टिकोन आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांच्या आधारे विद्यार्थ्यांनी पुढे गेले पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

जयंतीनिमित्त महाविद्यालयात निबंधलेखन, काव्यलेखन, रांगोळी, मेहंदी आणि चित्रकला अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'उन्मेष' या भित्तीपत्रिकेचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महात्मा गांधी विद्यालयाचे प्राचार्य नितीन बाणखेले, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय दवंडे, महात्मा गांधी इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या चित्रा बांगर, महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

प्रा. डॉ. बी. पी. गार्डी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. उपप्राचार्य प्रा. सुनील सालके यांनी आभार मानले. प्रा. डॉ. तुषार ढोणे आणि प्रा. एम. टी. भालेकर यांनी सूत्रसंचालन केले.

# एसटी बसस्थानकात दागिने चोरणाऱ्या आंतरजिल्हा टोळीतील तिघांना अटक

## चार तोळे सोन्याचे दागिने, ४.९० लाखांचा मुद्देमाल जप्त; दोन गुन्हे उघडकीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर : मंचर एसटी बसस्थानक परिसर तसेच बसमध्ये महिलांच्या अंगावरील सोन्याचे दागिने चोरणाऱ्या आंतरजिल्हा टोळीतील तिघांना मंचर पोलिसांनी अटक केली. आरोपींकडून चार तोळे वजनाचे सुमारे ४ लाख ९० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले असून, या कारवाईत चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पुणे ग्रामीण पोलिसांनी गस्त व पेट्रोलिंग वाढविण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार मंचर एसटी बसस्थानक परिसरात पोलिसांकडून गस्त सुरू असताना, बसस्थानकात सोन्याचे दागिने चोरी करणारी टोळी येणार असल्याची माहिती गोपनीय बातमीदारामार्फत पोलिसांना मिळाली.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून अशोक बबन भोसले (रा. कासारी, ता. आष्टी, जि. बीड; सध्या हिवरगाव फाटा, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर), अश्विनी अविनाश भोसले (रा. माहीजळगाव, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) आणि सतीश मधुकर गोरे (रा. शिवाजीनगर, जामखेड, जि. अहिल्यानगर) यांना ताब्यात घेतले.

तपासादरम्यान आरोपींकडून महिलांच्या गळ्यातील तसेच पिशव्यांमधील सोन्याचे दागिने चोरी केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. याप्रकरणी मंचर पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १४१/२०२६ आणि १२०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

आरोपींकडून चार तोळे सोन्याचे दागिने, अंदाजे किंमत ४ लाख ९० हजार रुपये, जप्त करण्यात आले आहेत. या टोळीने आणखी काही ठिकाणी अशाच प्रकारच्या चोऱ्या केल्या आहेत का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल, अपर पोलिस अधीक्षक शुभम कुमार आणि खेड विभागीय पोलिस अधिकारी अमोल मांढवे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर आणि मंचर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने ही कारवाई केली. पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा आणि मंचर पोलिस ठाण्याच्या वतीने सुरू आहे.

## सारांश वृत्त

### केवळ चेहराच नव्हे, २०२९ मध्ये राहुल गांधीच पंतप्रधान होणार!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी

निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात आज विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीची बैठक पार पडली. या बैठकीनंतर जम्मू-काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री तथा पीडीपी अध्यक्षा महबूबा मुफ्ती यांनी २०२९ च्या लोकसभा निवडणुकीसंदर्भात मोठे विधान केले आहे. ''२०२९ च्या निवडणुकीत राहुल गांधी हे केवळ विरोधी पक्षाचा चेहराच नसतील, तर 'इन्शाअल्लाह' ते भारताचे पंतप्रधान असतील,'' असा ठाम विश्वास त्यांनी मुफ्ती यांनी व्यक्त केला आहे. त्या पत्रकारांशी बोलत होत्या

''हा आजच्या बैठकीचा मुद्दा नव्हता...''

महबूबा मुफ्ती यांच्या या दाव्यानंतर 'इंडिया' आघाडीतील इतर नेत्यांनीही प्रतिक्रिया दिला आहे. दीपांकर भट्टाचार्य यांना यासंदर्भात विचारले असता ते म्हणाले, ''राहुल गांधी हे विरोधी पक्षाचा चेहरा आहेत की नाही, हा आजच्या बैठकीचा मुद्दा नव्हता. आजच्या बैठकीचा जो मुद्दा होता त्यासंदर्भात राहुल गांधी यांनी सातत्याने आवाज उठवला आहे, हे सत्य आहे. सध्याचा मुख्य मुद्दा २०२९ चा पंतप्रधान चेहरा नसून, सध्याच्या मुख्य निवडणूक आयुक्तांना, ज्यांना लोक 'प्रधान निवडणूक अभियुक्त' म्हणत आहेत, त्यांना पदावरून हटवणे हा आहे.'' याशिवाय, काँग्रेस खासदार सैयद नासिर हुसैन यांना विचारले असता, ते म्हणाले, ''२०२९ अजून दूर आहे, मात्र राहुल गांधी हेच सध्या आघाडीचे मुख्य नेतृत्व करत आहेत. हे नाकारता येणार नाही. ते रस्त्यावर उतरून लढत आहेत. केंद्र सरकारविरोधात नॅरेटिव्ह सेट करत आहेत. यावरून विरोधी पक्षांचा खरा नेता कोण? हे समजते.''

# दोन दशकांनंतर इराकमधून अमेरिकेची पूर्ण माघार; 'इसिस'विरोधातील १२ वर्षांची मोहीम संपली

■ दैनिक राज्य लोकतंत्र
बगदाद : प्रतिनिधी

मध्यपूर्वेतील अमेरिकेच्या लष्करी उपस्थितीला मोठा धक्का देणारी घडामोड बुधवारी घडली. अमेरिकेच्या लष्कराने इराकमधून आपल्या सर्व सैनिकांची माघार पूर्ण झाल्याची घोषणा केली. बगदाद आणि वॉशिंग्टन यांच्यात झालेल्या करारानुसार, उत्तर इराकमधील शेवटच्या हवाई तळावरूनही अमेरिकन सैनिक बाहेर पडले. त्यामुळे इराकमध्ये अमेरिकेची दोन दशकांहून अधिक काळाची लष्करी उपस्थिती संपुष्टात आली आहे.

अमेरिकेच्या लष्करानुसार, इराकमधील सैन्याची माघार ही इस्लामिक स्टेट अर्थात 'इसिस'विरोधात सुरू असलेल्या १२ वर्षांच्या लष्करी मोहिमेचा शेवट आहे. २०१४ मध्ये 'इसिस'विरोधातील कारवाईसाठी अमेरिकेने इराकमध्ये पुन्हा मोठ्या प्रमाणावर लष्करी उपस्थिती निर्माण केली होती. त्यानंतर अमेरिकी सैन्याने इराकी सुरक्षा दलांना प्रशिक्षण, गुप्तचर मदत आणि लष्करी सहकार्य दिले.

मात्र, अमेरिकेची ही माघार केवळ लष्करी हालचाल म्हणून पाहिली जात नाही. इराणने पश्चिम आशियातून अमेरिकन सैन्याची संपूर्ण हकालपट्टी हे आपले अंतिम उद्दिष्ट असल्याचे यापूर्वी म्हटले आहे. त्यामुळे इराकमधून अमेरिकेची माघार ही इराणकडून आणि त्याच्या सहकारी सशस्त्र गटांच्या 'प्रतिरोधाच्या अक्षाचा' विजय म्हणून मांडली जात आहे.

इराकमधील अमेरिकन उपस्थिती संपली असली तरी पश्चिम आशियातील अमेरिकेची लष्करी भूमिका पूर्णपणे संपलेली नाही. या माघारीनंतर इराकच्या सुरक्षेची जबाबदारी मोठ्या प्रमाणावर इराकी सुरक्षा यंत्रणांवर येणार आहे.

अमेरिकेच्या माघारीमुळे इराकच्या सुरक्षाव्यवस्थेवर, 'इसिस'च्या संभाव्य पुनरुत्थानावर आणि इराणच्या प्रादेशिक प्रभावावर पुढील काळात परिणाम होण्याची शक्यता आहे. दोन दशकांनंतर अमेरिकन सैनिकांचा इराकमधून पूर्णपणे बाहेर पडणे हे पश्चिम आशियातील बदलत्या सामरिक समीकरणाचे महत्त्वाचे चिन्ह ठरले आहे.

## मान्सूनने दिला दगा; २००१ नंतर यंदा देशात चौथा सर्वात कमी पाऊस

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली । प्रतिनिधी

यंदाचा मान्सून देशासाठी मोठा पावसाचा तुटवडा घेऊन आला आहे. जून ते सप्टेंबर या चार महिन्यांच्या मान्सून हंगामात देशभरात दीर्घकालीन सरासरीच्या केवळ ८७.४ टक्के पाऊस झाल्याची माहिती भारतीय हवामान विभागाने बुधवारी दिली. विशेष म्हणजे, २००१ नंतरचा यंदाचा मान्सून देशातील चौथा सर्वात कमी पावसाचा हंगाम ठरला आहे.

भारतीय हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार, देशात मान्सून हंगामातील सामान्य पर्जन्यमान ८६८.६ मिलिमीटर आहे. मात्र, यंदा प्रत्यक्षात केवळ ७५९.४ मिलिमीटर पाऊस नोंदवला गेला. म्हणजेच सामान्य पावसाच्या तुलनेत देशाला मोठ्या प्रमाणावर पावसाची कमतरता भासली.

मान्सूनच्या या तुटवड्याचा थेट परिणाम शेती, जलसाठे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होण्याची शक्यता आहे. पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने अनेक भागांत पिकांच्या पाण्याची गरज, सिंचनाची उपलब्धता आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होऊ शकतो.

विशेषतः शेतीसाठी जून ते सप्टेंबर हा कालावधी अत्यंत महत्त्वाचा असतो. देशातील मोठ्या भागातील शेती अद्याप मान्सूनच्या पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे ८७.४ टक्के दीर्घकालीन सरासरीवर थांबलेला मान्सून हा केवळ हवामानाचा आकडा नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेसमोरील गंभीर आव्हानाचा इशारा आहे.

यंदाच्या मान्सूनने मागील दोन दशकांतील चिंताजनक पावसाच्या हंगामांच्या यादीत स्थान मिळवले आहे. आता कमी पावसाचा परिणाम रब्बी हंगाम, जलसाठे आणि शेती उत्पादनावर किती होतो, हे आगामी महिन्यांत स्पष्ट होणार आहे.

## टाटा ट्रस्टमध्ये अंतर्गत संघर्ष उफाळला; आता नियामक चौकशीची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी




देशातील सर्वाधिक प्रभावशाली उद्योगसमूहांपैकी एक असलेल्या टाटा समूहातील अंतर्गत संघर्ष आता गंभीर वळणावर पोहोचला आहे. टाटा समूहावर नियंत्रण असलेल्या टाटा ट्रस्टमधील एका वरिष्ठ विश्वस्ताने संस्थेतील कथित अंतर्गत त्रुटी आणि कारभारातील बाबींवर नियामक चौकशीची मागणी केल्याचे समोर आले आहे.

टाटा समूहाच्या प्रमुख मालकी कंपनी टाटा सन्समध्ये या महिन्यात नेतृत्व आणि समूहातील सर्वात मोठा भागधारक असलेल्या टाटा ट्रस्ट यांच्यातील मतभेद उघडपणे समोर आले. त्यामुळे उद्योगजगतामध्ये या संघर्षाची तीव्रता आणि त्याचे संभाव्य परिणाम याबाबत चर्चा सुरू झाली आहे. टाटा समूहाचा व्यवसाय मीठापासून विमान वाहतूक, वाहननिर्मिती आणि तंत्रज्ञानापर्यंत मोठ्या प्रमाणावर विस्तारलेला आहे. टाटा ट्रस्ट आणि टाटा सन्स यांच्यातील संबंध त्यामुळे केवळ एका कंपनीपुरते मर्यादित नसून संपूर्ण समूहाच्या प्रशासनाशी जोडलेले आहेत. या पार्श्वभूमीवर वरिष्ठ विश्वस्ताकडून नियामक यंत्रणेकडे चौकशीची मागणी झाल्याने टाटा समूहाच्या अंतर्गत प्रशासनावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. मात्र, पत्रातील आरोपांची स्वतंत्रपणे सत्यता सिद्ध झालेली नाही आणि संबंधित नियामक चौकशीचा निष्कर्षही अद्याप समोर आलेला नाही.

टाटा सन्सच्या मालकीखाली जग्वार लँड रोव्हरसारख्या जागतिक ब्रँडसह अनेक मोठ्या कंपन्या कार्यरत आहेत. त्यामुळे समूहातील उच्चस्तरीय मतभेदांचा परिणाम केवळ व्यवस्थापनापुरता राहणार की त्याचा व्यापक व्यावसायिक परिणाम होणार, याकडे उद्योगक्षेत्राचे लक्ष लागले आहे.

टाटा समूहाची ओळख दीर्घकाळ विश्वास, संस्थात्मक स्थैर्य आणि व्यावसायिक प्रशासनाशी जोडली गेली आहे. अशा वेळी अंतर्गत कारभाराच्या चौकशीची मागणी सार्वजनिक चर्चेत येणे ही समूहाच्या प्रशासनासाठी निश्चितच महत्त्वाची घडामोड ठरली आहे.

## ऑस्ट्रेलियावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी भारताची नवी धडपड; मंगोलियातून कोकिंग कोळशाची हवाई वाहतूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

पोलाद उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या कोकिंग कोळशाचा पुरवठा सुरक्षित करण्यासाठी भारताने आता मंगोलियाकडेही वळण्यास सुरुवात केली आहे. भारतीय पोलाद प्राधिकरणाने म्हणजेच सेलने प्रथमच मंगोलियातून कोकिंग कोळशाचा नमुना विमानाने भारतात आणला आहे. ऑस्ट्रेलियावरील अवलंबित्व कमी करून कोळशाच्या पुरवठ्याचे नवे स्रोत शोधण्याच्या भारताच्या प्रयत्नांतील ही महत्त्वाची घडामोड मानली जात आहे.

रॉयटर्सच्या वृत्तानुसार, सेलने सप्टेंबर २०२६च्या सुरुवातीला मंगोलियातून एक मेट्रिक टन कोकिंग कोळशाचा नमुना विमानाने भारतात आणला. या कोळशाची पोलाद निर्मितीसाठी आवश्यक दर्जाची पूर्तता होते का, याची आता चाचणी केली जाणार आहे. ही माहिती सार्वजनिक करण्यात आलेली नसल्याने संबंधित दोन सूत्रांनी नाव जाहीर न करण्याच्या अटीवर ही माहिती दिली. मंगोलिया हा भूपरिवेष्टित देश असल्याने तेथून कोळसा भारतात आणणे मात्र सरळसोपे नाही.

भारत आणि चीनमधील तणावपूर्ण संबंधांमुळे मंगोलियातून चीनमार्गे कोळसा वाहतूक करण्याच्या पर्यायावर अडचणी निर्माण होऊ शकतात. दुसरा पर्याय म्हणजे रशियामार्गे लांब पल्ल्याचा मार्ग; मात्र त्यामुळे वाहतूक खर्च वाढण्याची शक्यता आहे.

भारताने पोलाद उत्पादन वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यामुळे कोकिंग कोळशाची आयात भविष्यात आणखी वाढण्याची शक्यता आहे. सध्या ऑस्ट्रेलिया हा भारतासाठी कोकिंग कोळशाचा प्रमुख पुरवठादार आहे. मात्र एका देशावरील मोठे अवलंबित्व कमी करण्यासाठी भारत रशिया, अमेरिका, मंगोलिया यांसह विविध स्रोतांचा शोध घेत आहे. मंगोलियातील कोळशाचा नमुना चाचणीत अपेक्षित दर्जाचा ठरला, तरी किंमत, वाहतूकमार्ग आणि सातत्यपूर्ण पुरवठा हे तीन प्रश्न निर्णायक ठरणार आहेत. त्यामुळे मंगोलियाकडून मोठ्या प्रमाणावर आयात सुरू होण्यापूर्वी भारताला या तिन्ही आघाड्यांवरील अडथळे दूर करावे लागणार आहेत.

## वादाच्या भोवऱ्यातील 'डिफेंडर' अखेर परत; जरांगेंनी मूळ मालकाकडे पाठवली, सोलापुरात जल्लोष

■ दैनिक राज्य लोकतंत्र
सोलापूर / प्रतिनिधी




मनोज जरांगे यांच्या पश्चिम महाराष्ट्र दौऱ्यात चर्चेचा केंद्रबिंदू ठरलेली तब्बल १ कोटी ९० लाखांची डिफेंडर गाडी अखेर मूळ मालक सुभाष भोसले यांच्याकडे परत करण्यात आली आहे. अंतरवाली सराटीतून गाडी परत पाठवल्यानंतर ती सोलापूर जिल्ह्यात दाखल होताच माळशिरस तालुक्यातील संगम येथे मराठा बांधव आणि महिलांनी गाडीचे औक्षण करून स्वागत केले.

सांगोला तालुक्यातील चिकमहूद येथील व्यापारी आणि शेतकरी सुभाष भोसले यांच्या मालकीची ही गाडी होती. पश्चिम महाराष्ट्र दौऱ्यात जरांगे यांचा प्रवास अधिक आरामदायी व्हावा, या उद्देशाने ती वापरण्यास दिल्याचे भोसले यांनी यापूर्वी सांगितले होते. या गाडीसाठी त्यांनी दीड कोटी रुपयांचे कर्ज घेतल्याची माहितीही त्यांनी दिली होती.

गाडी जरांगेंच्या वापरात आल्यानंतर तिच्या मालकीवरून आणि वापरावरून राजकीय-सामाजिक वर्तुळात आरोप-प्रत्यारोप सुरू झाले. मात्र, जरांगे यांनी सुरुवातीपासूनच ही गाडी आपली नसून एका समाजबांधवाने वापरण्यास दिल्याचे स्पष्ट केले होते. उपलब्ध माहितीनुसार, गाडीची मालकी भोसले यांच्याकडेच असल्याचे समोर आले आहे.

आता हीच गाडी परत सोलापुरात पोहोचली असून तिचे समर्थकांकडून करण्यात आलेले स्वागत पुन्हा चर्चेचा विषय ठरले आहे. दरम्यान, गाडी परत करण्यामागील नेमके कारण विविध वृत्तांत वेगवेगळ्या पद्धतीने मांडले जात असले तरी त्याबाबत अधिकृत स्पष्टीकरणाची प्रतीक्षा आहे.

## 'ब्लू ड्रम' हत्याकांडाचा निकाल; मुस्कान आणि साहिल दोषी, आता शिक्षेकडे देशाचे लक्ष

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मेरठ / वृत्तसंस्था

मेरठमधील सौरभ राजपूत हत्याकांडाने देशभरात निर्माण केलेल्या संतापानंतर अखेर न्यायालयीन निकाल समोर आला आहे. जिल्हा न्यायालयाने बुधवारी, ३० सप्टेंबरला, सौरभची पत्नी मुस्कान रस्तोगी आणि साहिल शुक्ला यांना हत्येप्रकरणी दोषी ठरवले. मृतदेह निळ्या प्लास्टिकच्या ड्रममध्ये लपवण्यात आल्याने हे प्रकरण 'ब्लू ड्रम मर्डर' म्हणून चर्चेत आले होते. आता शिक्षेच्या प्रमाणावर युक्तिवाद होणार असून न्यायालयाने शिक्षेबाबतचा निर्णय राखून ठेवला आहे.

या खटल्यात तब्बल १२६ सुनावण्या, २२ हून अधिक साक्षीदार आणि सुमारे १३ महिन्यांची न्यायालयीन प्रक्रिया झाली. सरकारी पक्षाने वैज्ञानिक, भौतिक आणि परिस्थितीजन्य पुराव्यांची साखळी न्यायालयासमोर मांडली. संबंधित दुकानदारांनी ड्रम, सिमेंट, वाळू आणि धारदार हत्यारांच्या खरेदीबाबतही साक्ष दिली. बचाव पक्षाने मात्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसल्याचा युक्तिवाद केला होता.

पोलिसांच्या तपासानुसार, सौरभची हत्या मार्च २०२५मध्ये करण्यात आली आणि त्याचा मृतदेह ड्रममध्ये लपवण्यात आला. त्यानंतर मुस्कान आणि साहिल शिमल्याकडे गेल्याचे तपासात समोर आले होते. दोघांना नंतर अटक करण्यात आली.

निकालापूर्वी सौरभच्या कुटुंबीयांनी कठोर शिक्षेची मागणी केली होती. आता न्यायालय दोष सिद्ध झाल्यानंतर कोणती शिक्षा सुनावते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# 'अभिव्यक्तिस्वातंत्र्या'च्या नावाखाली बदनामीला मोकळीक नाही; त्रिपुरा उच्च न्यायालयाचा स्पष्ट इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र
अगरतळा / प्रतिनिधी

समाजमाध्यमांवर काहीही लिहून किंवा प्रसारित करून त्याला अभिव्यक्तिस्वातंत्र्याचे संरक्षण मिळू शकते, असा दावा करता येणार नाही, असे स्पष्ट करत त्रिपुरा उच्च न्यायालयाने पंतप्रधान नरेंद्र मोदी, अगरतळ्याचे महापौर आणि माता त्रिपुरेश्वरी यांच्याविषयी कथित आक्षेपार्ह, अपमानास्पद आणि बदनामीकारक मजकूर प्रसारित केल्याच्या प्रकरणात आशय निर्मात्या माधबी बिस्वास यांच्याविरोधातील प्रथम माहिती अहवाल आणि आरोपपत्र रद्द करण्यास नकार दिला. न्यायालयाने हा टप्पा तपासाच्या सुरुवातीचा असल्याचे नमूद करत पुढील तपासालाही परवानगी दिली आहे.

न्यायमूर्ती डॉ. टी. अमरनाथ गौड आणि न्यायमूर्ती एस. दत्ता पुरकायस्थ यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की, भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १९(१)(अ) अंतर्गत अभिव्यक्तिस्वातंत्र्य हा मूलभूत अधिकार आहे; मात्र हा अधिकार निरंकुश नाही. अनुच्छेद १९(२) अंतर्गत बदनामी, सार्वजनिक सुव्यवस्था, सभ्यता आणि नैतिकता यांसारख्या कारणांवर वाजवी निर्बंध लागू होऊ शकतात. त्यामुळे समाजमाध्यमांवरील प्रत्येक पोस्ट, व्हिडीओ किंवा टिप्पणी केवळ 'अभिव्यक्तिस्वातंत्र्य' या लेबलखाली कायदेशीर संरक्षण मिळवू शकत नाही.

या प्रकरणात आरोपीने पंतप्रधानांविरोधात तसेच अगरतळ्याच्या महापौरांविषयी कथित आक्षेपार्ह आणि अवमानकारक भाषा वापरल्याचा आरोप आहे. माता त्रिपुरेश्वरी यांच्याबाबत केलेल्या कथित वक्तव्यामुळे धार्मिक भावना दुखावल्याचाही आरोप तक्रारीत करण्यात आला होता. आरोपीने या प्रकरणातील दोन गुन्हे आणि त्यानंतर दाखल झालेले आरोपपत्र रद्द करण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, न्यायालयाने उपलब्ध आरोप आणि तपासातील सामग्रीच्या आधारे या टप्प्यावर संपूर्ण कारवाई निराधार असल्याचे म्हणता येणार नाही, असे स्पष्ट केले.

न्यायालयाने समाजमाध्यमांच्या वाढत्या प्रभावाकडेही लक्ष वेधले. समाजमाध्यमांवर माहिती आणि मते मोठ्या वेगाने प्रसारित होतात; मात्र त्याच माध्यमातून खोटी, बदनामीकारक किंवा अपमानास्पद माहितीही अल्पावधीत मोठ्या प्रमाणावर पसरू शकते. त्यामुळे प्रत्यक्ष जीवनात एखाद्या व्यक्तीविषयी बदनामीकारक वक्तव्य केल्यास ज्याप्रमाणे कायदेशीर परिणाम होऊ शकतात, त्याचप्रमाणे समाजमाध्यमांवर प्रसिद्ध केलेल्या मजकुरालाही कायद्याच्या चौकटीत तपासले जाऊ शकते.

या प्रकरणातील तपास अद्याप पूर्ण झालेला नसल्याचेही न्यायालयाच्या आदेशातून स्पष्ट झाले. पोलिसांनी आरोपीचा मोबाईल जप्त केला असला तरी कथित व्हिडीओ किंवा त्याच्या नोंदी त्यांना मिळाल्या नव्हत्या. तपास अधिकाऱ्याने संबंधित व्हिडीओ शोधण्यासाठी आणि न्यायालयासमोर सादर करण्यासाठी अतिरिक्त वेळ मागितला होता. साक्षीदारांचे जबाबही नोंदवण्यात आले असून, उपलब्ध सामग्रीच्या आधारे पुढील तपासाची गरज असल्याचे न्यायालयाने मान्य केले.

महत्त्वाचे म्हणजे, न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवलेले नाही. उच्च न्यायालयासमोरचा प्रश्न या टप्प्यावर एफआयआर आणि आरोपपत्र रद्द करायचे की नाही, एवढाच होता. न्यायालयाने हस्तक्षेप नाकारल्याने प्रकरणातील तथ्ये, कथित वक्तव्यांचे नेमके स्वरूप, त्यांचा संदर्भ आणि त्यातून कायदेशीर गुन्ह्याचे घटक सिद्ध होतात का, याचा निर्णय पुढील न्यायालयीन प्रक्रियेत होणार आहे. तपासात नवे पुरावे मिळाल्यास पूरक आरोपपत्र दाखल करण्याचाही तपास यंत्रणेला अधिकार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. या निकालाचा व्यापक मुद्दा मात्र स्पष्ट आहेसमाजमाध्यमे हे कायद्याच्या बाहेरचे क्षेत्र नाही. सरकार, राजकीय नेते किंवा सार्वजनिक व्यक्तींवर टीका करण्याचा अधिकार अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा भाग असू शकतो; परंतु बदनामी, जाणूनबुजून अपमान, खोटी माहिती किंवा कायद्याने प्रतिबंधित आशय यासाठी स्वतंत्र कायदेशीर जबाबदारी निर्माण होऊ शकते. त्यामुळे 'मत मांडणे' आणि 'कायद्याचे उल्लंघन करणारा मजकूर प्रसारित करणे' यातील सीमारेषा प्रत्येक प्रकरणातील तथ्यांच्या आधारे तपासावी लागणार आहे.